# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी – ४११ ०१८,

## अग्निशामक विभाग,

**मानधन तत्वावर ६ महिने मुदतीसाठी करार पध्दतीने तांत्रिक कर्मचारी नेमणूक करणेबाबत.**

जाहिरात क्रमांक - ४२ /२०१९ दि. ३१ /०८/२०१९

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अग्निशामक विभागामार्फत ६ महिने मुदतीसाठी अग्निशामक विभागाकरिता खालील प्रमाणे तांत्रिक कर्मचारी करार पध्दतीने ६ महिने मुदतीसाठी मानधन तत्वावर नियुक्त करावयाचे आहे. त्याकरिता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हताधारक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

| क्र. | पदनांम | पात्रता / अर्हता | पद संख्या | वय मर्यादा | आरक्षित पदे संख्या | एकवट मासिक वेतन र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभिंयता (ऑटोमोबाईल) | १) शासनमान्य ऑटोमोबाईल अथवा मेकॅनिकल इंजिनिअरिंग पदविका (डिप्लोमा)<br>२) सदर पदाचा कामकाजाचा किमान २ वर्षाचा अनुभव.<br>३)जडवाहन चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य. | ०१ | कमाल ४० वर्षे | एकाकी पद आरक्षण लागू नाही. | २०,०००/- |
| २ | मोटार मेकॅनिक | १) माध्यमिक शालांत (SSC) परिक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>२) शासनमान्य ITI मोटार मेकॅनिक पाठ्यक्रम उत्तीर्ण.<br>३) सदर पदाचा कामकाजाचा किमान १ वर्षाचा अनुभव.<br>३) जडवाहन चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य. | ०३ | कमाल ४० वर्षे | अनु. जाती. – ०१<br>इमाव - ०१<br>खुला – ०१ | १५,०००/- |
| ३ | पंप मेकॅनिक | १) माध्यमिक शालांत (SSC) परिक्षा उत्तीर्ण आवश्यक<br>२) शासनमान्य ITI कडील पंप मेकॅनिक पाठ्यक्रम उत्तीर्ण .<br>३) फायर फायटिंग पंप्स व पीटीओ दुरूस्तीचा किंवा सदर पदाचा किमान १ वर्षांचा अनुभव<br>४) जडवाहन चालविण्याचा वैध परवाना असल्यास प्राधान्य. | ०२ | कमाल ४० वर्षे | अनु. जाती – ०१<br>खुला - ०१ | १५,०००/- |

**अटी व शर्ती :-**

१) करारपध्दतीने केलेली नेमणुक ही फक्त ६ महिने मुदतीची असेल. त्यामूळे अर्जदारास कायम स्वरुपी नेमणुकीचा कोणताही हक्क राहणार नाही अथवा या संदर्भात मे. न्यायालयात दाद मागता येणार नाही. याबाबतचे र.रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर हमीपत्र रुजू होते वेळी सादर करावे लागेल.

२) उमेदवाराने अर्जासोबत शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक व व्यावसायीक अर्हता विषयक प्रमाणपत्र, जातीचा दाखला, अनुभव, इत्यादी कागदपत्रांच्या स्वसांक्षांकित प्रती जोडणे आवश्यक आहे.

३) ज्या दिवशी अग्निशामक विभांगास सदर पदांची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटीशी शिवाय, सदर उमेदवारांची सेवा थेट संपुष्टात आणण्यात येईल. या संबंधिचे सर्व अधिकार अग्निशामक विभागाने राखुन ठेवले आहे.

४) पात्र उमेदवारांना नेमणुक देताना पद संख्या कमी जास्त करण्याचा अधिकार अग्निशामक विभागांस राहील.

५) उमेदवारांनी सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात, पदांसाठी अर्ज, मुख्य अग्निशामक अधिकारी, जनरल अरुणकुमार वैद्य मुख्य अग्निशामक केंद्र, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८ या नावाने करावा. सदर अर्ज दिनांक १६ / ०९ /२०१९ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यत वरील पत्त्यावर रजिस्टर पोस्टाने पोहचतील अशा बेताने पाठवावेत किंवा कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावेत.

६) निवड झालेल्या उमेदवारांस एकवट मानधना व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सोयी सुविधा, हक्क व इतर आर्थीक लाभ देय राहणार नाही.

७) अर्जदाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार पात्रता धारण न करणारा, गैरवर्तन करताना/दबावतंत्राचा वापर करताना आढळल्यास. त्याची उमेदवारी / निवड रद्दबातल करण्यात येईल तसेच नियुक्ती झाल्यासही कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

८) ज्या पदाकरिता अर्ज केलेला आहे. त्या पदाचे नाव पाकीटावर ठळक अक्षरात लिहावे.

९) दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१०) पोस्टाने पाठविलेले अर्ज गहाळ झाल्यास अथवा विलंब झाल्यास, त्यांस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. विहीत नमुन्यात नसलेला अर्ज, अपुर्ण, चुकीचे कागदपत्रे जोडलेले व वेळेत प्राप्त न झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

११) अर्जदाराने आपला अर्ज महापालिकेने जाहीरातीमध्ये विहीत केलेल्या अर्ज नमुन्या प्रमाणे करणे बंधनकारक राहील.

१२) अपूर्ण माहिती अथवा अटींची पुर्तता न करणा-या उमेदवारांचे अर्ज बाद, अपात्र ठरविले जातील. अपात्र अर्ज कार्यालयात जमा करणेत येतील, त्याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३) सदरचे पद हे पुर्णपणे तात्पुरत्या व हंगामी स्वरुपाचे आहे. यापदावर उमेदवारांस मनपा सेवेत राहण्याचा अधिकार मागता येणार नाही.

१४) मनपाचे कै. यंशवंतराव चव्हाण रुग्णालय, पिंपरी यांचेकडुन शारिरीक सक्षम ( फिटणेस ) बाबत वैद्यकिय प्रमाणपत्र रूजू होताना जोडणे आवश्यक आहे. उमेदवार हा शारिरीक किंवा वैद्यकिय दृष्टया अपात्र असलेचे निदर्शनास आल्यास कोणतीही पुर्व सुचना न देता उमेदवाराची सेवा संपुष्टात करणेत येईल.

१५) उमेदवारांना स्वखर्चाने तांत्रीक पदाचा गणवेश शिवून घ्यावा लागेल तसेच सेफ्टी बुट ई. परिधान करावे लागतील. विभागाकडून कोणत्याही प्रकारचा गणवेश ई. साहित्य उपलब्ध होणार नाही.

१६) आग, पुर, भुकंप ई. आपत्कालीन परिस्थीतीत जोखमीचे व धाडसाचे काम करावे लागणार असल्याने त्याचा कोणताही अतिरीक्त मोबदला अथवा विमा ई. सुरक्षा उपलब्ध् होणार नाही. सदर जोखमीचे काम, स्वजबाबदारीवर करावयाचे असून त्याबाबतचे हमीपत्र नियुक्तीचे वेळेस सादर करणे बंधनकारक आहे.

१७) मनपा सेवेत असताना उमेदवाराच्या चुकीमुळे मनपाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई करुन घेणेत येईल.

सदरची जाहीरात व अर्जाचा नमुना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर पाहता येईल. पद भरतीची प्रक्रीया कोणत्याही वेळी, स्तरावर रद्द करण्याचा अथवा त्यामध्ये बदल करण्याचा अंतिम निर्णय पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस राहील.

सही/-
मुख्य अग्निशामक अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

सही/-
अतिरीक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – १८

<u>अर्जाचा नमुना</u>

पासपोर्ट साईज
फोटो

प्रति,
मा.मुख्य अग्निशामक अधिकारी,
जनरल अरुणकुमार वैदय मुख्य अग्निशमन केंद्र,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे ४११ ०१८.

<u>विषय :- मोटार मेकॅनिक / पंप पेमकॅनिक / कनिष्ठ अभियंता पदी मानधनावर नेमणुकीबाबत</u>.

महोदय,

संदर्भीय दिनांक / /२०१९ जाहीरातीनुसार मी (संपुर्ण नांव अडनाव प्रथम) ---------------------------------------------- ------------------------------------------- " फायरमन " या पदासाठी आवश्यक ती शैक्षणिक अर्हता धारण करीत असुन, फायरमन या पदासाठी निवड होण्याकरिता विहीत नमुन्यातील अर्ज सादर करीत आहे.

आडनाव स्वत:चे नाव वडीलांचे/पतीचे नाव

१.संपुर्ण नाव ----------------------------------------------------------------------------------------------------

२.पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता ----------------------------------------------------------------------------------------------------

(पिनकोडसह) ----------------------------------------------------------------------------------------------------

३.दुरध्वनी/मोबाईल क्र. ----------------------------------------------------------------------------------------------------

४.जन्मतारीख दि. / / (अक्षरी------------------------------------------------------------------------)

५.लिंग स्त्री / पुरुष

६.जात ----------------------------------------------------------------------------------------------------

७.प्रवर्ग (✓ अशी खुण करा) - अनु.जाती. / अनु.जमाती / विजा-अ /भज-ब/ भज-क / भज-ड / विमाप्र / इमाव /ईडब्ल्युएस/ एसईबीसी/ खुला

८.अर्जदाराने धारण केलेल्या शैक्षणिक अर्हतेचा तपशील

| अ.क्र. | शैक्षणिक अर्हता | विद्यापिठ/ संस्थंचे नांव | उर्तीण वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

९. जड वाहन परवाना :क्र. ................................... कालावधी दिनांक ................................

१०.अनुभव –

| क्र. | संस्थेचे नांव | पदनाम | कामकाजाचे स्वरुप | अनुभव कालावधी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

वर नमुद केलेला तपशील खरा व बरोबर असुन, त्याबाबत आवश्यक प्रमाणपत्रांच्या प्रती सोबत जोडत आहे. मी असेही प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळुन् आल्यास तया माहितीच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात मानधनावरील नियुक्ती रद्द होण्यास मी पात्र राहीन तसेच माझ्या विरुध्द कायदेशीर कारवाई केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

ठिकाण :

दिनांक : अर्जदाराची सही व नाव

सहपत्रे :